U.S. CONSULATE GENERAL
MUMBAI - INDIA

**PRESS RELEASE** **Thursday, February 13, 2014**

अमेरिकेच्या भारतातील दूतावासाचे प्रसिद्धी पत्रक, फेब्रूवारी १३, २०१४

अमेरिकेच्या भारतातील राजदूत नेन्सी जे पॉवेल आज गुजरातचे मुख्यमत्री नरेंद्र मोदीयांना भेटल्या. पुढील काळात भारतात होणारया निवडणुकांच्या संदर्भात अमेरिकी दूतावासाने सर्व राजकीय पक्षांच्या मोठ्या नेत्यांशी चर्चा केली आहे व मोदींची भेट हा त्याचा भाग आहे. आपल्या गुजरात भेटीत राजदूत पॉवेल अनेक बिगर राजकीय संघटनांच्या प्रतिनिधींना व अमेरिकी आणि भारतीय उद्योजकांना भेटणार आहेत. भारत-अमेरिका संबंध, मानव अधिकार, सुरक्षा-विषयक मुद्दे व व्यापार संधींवर त्या चर्चा करतील.

भारत आणि अमेरिकेचे संबंध विशाल, बहुआयामी आणि परस्परपूरक आहेत व अत्यंत महत्वाच्या चांगल्या दिशेने वाटचाल करत आहेत. राजदूत पॉवेल २०१३ नोव्हेंबरपासून भारत-अमेरिका संबंधांवर वेगवेगळ्या लोकांशी बोलत आहेत. त्यांच्या मते अमेरिका-भारत भागीदारी फार महत्वाची आहे आणि भारतातील लोक येत्या निवडणुकीत ज्या प्रशासनाला निवडतील त्यांच्या प्रतिनिधींबरोबर सहकार्य करायला अमेरिका उत्सुक आहे.